**डॉ. व्ही. एन. बेडेकर इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट स्टडीज, ठाणे (ब्रीम्स) ठाणे**

## डॉ. व्ही .एन. बेडेकर व्यवस्थापन अभ्यास संस्थेतर्फे "मराठी भाषा दिन" साजरा !




दिनांक २७ फेब्रुवारी २०२० रोजी "मराठी भाषा दिनाच्या निमित्ताने डॉ. व्ही.एन. ब्रीम्स तर्फे मराठी भाषेचा गौरव व मराठी भाषेच्या वारशाचे जतन करण्याच्या उद्देशाने एका सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. पारंपरिक पद्धतीने दीप प्रज्वलन आणि गणेश वंदनाने कार्यक्रमाची सुरुवात झाली.

मराठी भाषेचा इतिहास आणि या दिनाचे महत्व या संबधी प्रास्ताविक सादर केल्या नंतर कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे; जोशी-बेडेकर महाविद्यालयाचे ग्रंथपाल श्री . नारायण बारसे यांनी आपल्या ओघवत्या शैलीत विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. मराठी भाषेची महती, मराठी भाषे संदर्भात सांख्यिकीय माहिती, मराठी साहित्य, मराठी प्रकाशन विश्व, मराठी भाषेला अभिजात दर्जा मिळावा या बद्दलचे प्रयत्न, मराठी भाषे संदर्भातील शासकीय निर्णय, अशा अनेक बाबींसंदर्भात महत्वपूर्ण माहिती त्यांनी विद्यार्थ्यांना दिली. तसेच कुसुमाग्रजांच्या "कणा" कवितेचा भावार्थ समजावून सांगून ; वात्रटिका / विडंबन कवितांच्या मार्मिकतेचे उदाहरण देऊन मराठी भाषेतील शब्दांचे सामर्थ्य त्यांनी विद्यार्थ्यांना सांगितले. आपली मातृभाषा असलेल्या आपल्या या मराठी चा हा समृद्ध वारसा टिकवण्याचे कर्तव्यही आपलेच आहे आणि याची जाण आपण ठेवली पाहिजे. आणि त्यासाठी शक्य तिथे मराठीतून बोलणे सुरु ठेवले पाहिजे कारण भाषा जो पर्यंत बोलली जाते तो पर्यंत ती जिवंत राहते. अन्यथा मृत पावते. असे मत त्यांनी व्यक्त केले.

त्यानंतर मराठी चे महत्व सांगणारी ध्वनी चित्रफीत, मराठी कविता , मराठी भावगीते , आपल्या मित्रांना छोटासा संदेश देणारी संगीत नाटिका, मराठी भाषेतील म्हणी आणि शब्दांचे गमतीदार खेळ , बोली भाषा आणि लोक-कलां वर आधारित बहुरंगी, मराठमोळा आणि बहारदार असा नृत्याविष्कार असे विविध कलाविष्कार विद्यार्थ्यांनी सादर केले. नव्या पिढीचे असूनही या कार्यक्रमातून सादर झालेली मराठी भाषे बद्दलची विद्यार्थ्यांची, आपुलकी नक्कीच कौतुकास्पद होती.